# कॉस्ट अकौंटंट्सची भूमिका भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाची

## अर्थसंकल्पावर चर्चासत्र

### आर. के. राऊतरे यांचे प्रतिपादन

**औरंगाबाद, ता. ११ :** ''यंदा जाहीर झालेला अर्थसंकल्प सर्वसामान्यांच्या फायद्याचा असून, भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी पूरक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत कॉस्ट अकौंटंट्सची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे,'' असे प्रतिपादन केंद्रीय अबकारी आणि सीमाशुल्क विभागाचे आयुक्त (अपील्स) आर. के. राऊतरे यांनी केले.

औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकौंटंट्स या 'आयसीडब्ल्यूएआय' कोलकत्त्यांच्या स्थानिक शाखेतर्फे हॉटेल प्रेसिडेंट पार्क येथे नुकत्याच आयोजित 'अर्थसंकल्प २००७' या विषयावरील चर्चासत्रात प्रमुख पाहुणे म्हणून श्री. राऊतरे बोलत होते. अध्यक्षस्थानी आयसीडब्ल्यूएआयचे राष्ट्रीय अध्यक्ष धनंजय जोशी होते.

या प्रसंगी श्री. जोशी यांनी भारतीय अर्थव्यवस्था अधिक भक्कम आणि सक्षम बनविण्यासाठी अर्थव्यवस्थेला जाणणाऱ्या तज्ज्ञांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते, असे प्रतिपादन केले. भारताने स्वीकारलेली मुक्त अर्थव्यवस्था, जागतिकीकरण, राष्ट्रीय उत्पन्नाचा वाढता दर या सर्व पार्श्वभूमीवर अर्थसंकल्प बनविणे अत्यंत गुंतागुंतीचे आणि आव्हानात्मक बनले आहे. कारण भारताला आर्थिक महासत्ता बनण्यासाठी अंतर्गत विकासाबरोबरच जागतिक आव्हानांचा सामना करणेही आवश्यक बनले आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत कॉस्ट अकौंटंट्सचे योगदान मोलाचे असल्याचे ते म्हणाले.

यात व्ही. एस. दाते यांनी केंद्रीय अबकारी कर, राजेश शुक्ला यांनी सेवाकराची वाढलेली व्याप्ती, सेवाकरातील बदल या बाबतीत मार्गदर्शन केले. आर. एम. पंडित यांनी आयात-निर्यात करातील बदलांविषयी मार्गदर्शन केले तर आर. जी. झंवर यांनी आयकरातील बदलाची माहिती दिली.

चॅप्टरचे अध्यक्ष आर. पी. गोरे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. ए. आर. जोशी यांनी प्रास्ताविक केले. एस. आर. पिंपळे यांनी सूत्रसंचालन केले. बिश्वेश्वर सेन यांनी आभार मानले. चर्चासत्राला आर. एम. पंडित, आर. जी. मोदानी, एस. बी. खडके, एस. बी. बंगाळे, जे. बी. गलांडे, शांतकुमार, श्री. देवरे आईद सदस्य तसेच औद्योगिक क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# 'आयसीडब्ल्यूए'चे अध्यक्ष धनंजय जोशी उद्या शहरात

## अर्थसंकल्पावरील चर्चासत्रात सहभाग

औरंगाबाद, ता. ५ : दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकौंटंट्स ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष धनंजय व्ही. जोशी हे बुधवारी (ता. सात) शहरात येत आहेत. औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकौंटंट्सच्या वतीने आयोजित 'बजेट २००७'मधील सेंट्रल एक्साईज, कस्टम्स, सर्व्हिस टॅक्स आणि प्राप्तिकरातील बदलाविषयी माहिती देणाऱ्या चर्चासत्रात ते मार्गदर्शन करणार आहेत.

या चर्चासत्रात नाशिकचे एक्साईज व सर्व्हिस टॅक्स या विषयाचे तज्ज्ञ आणि लेखक व्ही. एस. दाते, औरंगाबादचे आर. बी. शुक्ला, आर. जी. झंवर, आर. एम. पंडित आदी सहभागी होणार आहेत, अशी माहिती चॅप्टरचे अध्यक्ष आर. पी. गोरे, उपाध्यक्ष आर. बी. शुक्ला यांनी दिली. सहभागासाठी संस्थेच्या जवाहर कॉलनीस्थित कार्यालयात संपर्क साधण्याचे आवाहन ए. आर. जोशी यांनी केले आहे.

# चॅप्टर ऑफ कॉस्ट अकौंट्सचे 'अर्थसंकल्प' चर्चासत्र उत्साहात

**औरंगाबाद, ता. १७ :** औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकौंट्स या 'आयसीडब्ल्यूए' कोलकत्त्याच्या स्थानिक शाखेतर्फे आयोजित 'अर्थसंकल्प २००६' वरील एकदिवसीय चर्चासत्र शुक्रवारी (ता. १७) हॉटेल प्रेसिडेंट पार्क येथे उत्साहात झाले. केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त (अपील) आर. के. राऊतरे उद्‌घाटन सत्राला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

चर्चासत्रात मार्गदर्शनाकरिता एस. आर. भार्गवे, आर. जी. झंवर आणि चंद्रशेखर चितळे हे तज्ज्ञ उपस्थित होते. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांमध्ये झालेल्या बदलांवर त्यांनी मार्गदर्शन केले. या वेळी श्री. राऊतरे यांनी सांगितले, की महसुलात वाढ करण्यासाठी कस्टमचा करदर कमी करून करांचा पाया वाढविला आहे. भारताने 'गॅट' करारावर स्वाक्षरी केल्याने मुक्त अर्थव्यवस्थेला चांगले दिवस येऊन देशाची आर्थिक स्थिती सुधारते आहे. या वेळी श्री. भार्गवे यांनी, सेवाकरांची वाढत जाणारी व्याप्ती आणि सतत बदलणाऱ्या नियमांवर विवेचन केले. प्रत्यक्ष करांमध्ये झालेल्या बदलांवर राजेंद्र झंवर यांनी, तर फ्रिंज बेनिफिट टॅक्सवर चंद्रशेखर चितळे यांनी मार्गदर्शन केले. या वेळी श्री. भार्गवे यांच्या हस्ते 'बेस्ट चॅप्टर ॲवॉर्ड-२००५' हा बहुमान औरंगाबाद चॅप्टरचे अध्यक्ष आर. पी. गोरे यांना प्रदान करण्यात आला. चॅप्टरचे अध्यक्ष आर. पी. गोरे यांनी स्वागत केले. एस. आर. पिंपळे यांनी परिचय करून दिला, तर ए. आर. जोशी यांनी चर्चासत्र आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. चॅप्टरचे उपाध्यक्ष आर. बी. शुक्ला यांनी सूत्रसंचालन केले तसेच आभार मानले. कार्यक्रमाला एम. आर. पंडित, एस. के. जैन, जी. आर. कुलकर्णी आदी उपस्थित होते.



'अर्थसंकल्प २००६' या चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त आर. के. राऊतरे यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर आर. बी. शुक्ला, एस. आर. भार्गवे, आर. पी. गोरे आणि एस. के. जैन.

दैनिक सकाळ (दि. 18/3/06)

# सेवाकरातील वाढ 'जीएसटी'च्या दिशेने टाकलेले पाऊल - भार्गवे

लोकमत ब्युरो / १७ मार्च

■ औरंगाबाद : केंद्र सरकारने सेवाकरात दोन टक्क्याने केलेली वाढ वर्ष २०१० मध्ये लागू होणाऱ्या 'गुडस् सर्व्हिस टॅक्स'च्या (जी.एस.टी.) दिशेने टाकण्यात आलेले पाऊल असल्याचे उद्‌गार आय.सी.डब्ल्यू.ए.आय.च्या पश्चिम विभागाचे माजी अध्यक्ष संजय भार्गवे यांनी काढले.

आय.सी.डब्ल्यू.ए.आय.च्या औरंगाबाद शाखेने आयोजित केलेल्या अर्थसंकल्पा-वरील चर्चासत्रात बोलताना भार्गवे म्हणाले की, यंदाच्या अर्थसंकल्पात कोणतीही दुरुस्ती अथवा बदल नसल्याचे सरकार म्हणत असले, तरी बारकाईने विचार केल्यास अर्थसंकल्प किती भक्कम आहे, हे लक्षात येते. केंद्रीय उत्पादन व सीमा शुल्क विभागाचे आयुक्त (अपिल्स) आर.के. राऊतराय यांनी आपले मत मांडले. दुपारच्या सत्रात चार्टर्ड अकाऊंटंट राजेंद्र झंवर यांनी आयकरावर तर चंद्रशेखर चितळे यांनी एफबीटीवर प्रकाश टाकला. यावेळी एम.आर. पंडित, एस.के. जैन, जी.आर. कुलकर्णी आदी उपस्थित होते. औरंगाबाद शाखेचे अध्यक्ष आर.पी. गोरे यांनी स्वागत केले. प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष ए.आर. जोशी यांनी प्रास्ताविक केले. सुरेश पिंपळे यांनी परिचय करून दिला.

## औरंगाबादला 'बेस्ट चॅप्टर' पुरस्कार

आय.सी.डब्ल्यू.ए.आय.च्या औरंगाबाद शाखेला वर्ष २००४-०५ चा 'बेस्ट चॅप्टर' पुरस्कार भार्गवे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्काराची घोषणा सप्टेंबरमध्ये भुवनेश्वरला करण्यात आली. औरंगाबाद शाखेच्या विविध उपक्रमांमुळे व विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे हा पुरस्कार मिळाला आहे. औरंगाबाद शाखेने या पुरस्काराची हॅट्रिक केली आहे.

D. LOKMAT

# चॅप्टर ऑफ कॉस्ट अकौंट्सचे 'अर्थसंकल्प' चर्चासत्र उत्साहात

**औरंगाबाद, ता. १७ :** औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकौंट्स या 'आयसीडब्ल्यूए' कोलकत्त्याच्या स्थानिक शाखेतर्फे आयोजित 'अर्थसंकल्प २००६' वरील एकदिवसीय चर्चासत्र शुक्रवारी (ता. १७) हॉटेल प्रेसिडेंट पार्क येथे उत्साहात झाले. केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त (अपील) आर. के. राऊतरे उद्‌घाटन सत्राला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

चर्चासत्रात मार्गदर्शनाकरिता एस. आर. भार्गवि, आर. जी. झंवर आणि चंद्रशेखर चितळे हे तज्ज्ञ उपस्थित होते. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांमध्ये झालेल्या बदलांवर त्यांनी मार्गदर्शन केले. या वेळी श्री. राऊतरे यांनी सांगितले, की महसुलात वाढ करण्यासाठी कस्टमचा करदर कमी करून करांचा पाया वाढविला आहे. भारताने 'गॅट' करारावर स्वाक्षरी केल्याने मुक्त अर्थव्यवस्थेला चांगले दिवस येऊन देशाची आर्थिक स्थिती सुधारते आहे. या वेळी श्री. भार्गवि यांनी, सेवाकरांची वाढत जाणारी व्याप्ती आणि सतत बदलणाऱ्या नियमांवर विवेचन केले. प्रत्यक्ष करांमध्ये झालेल्या बदलांवर राजेंद्र झंवर यांनी, तर फ्रिंज बेनिफिट टॅक्सवर चंद्रशेखर चितळे यांनी मार्गदर्शन केले. या वेळी श्री. भार्गवि यांच्या हस्ते 'बेस्ट चॅप्टर अॅवॉर्ड-२००५' हा बहुमान औरंगाबाद चॅप्टरचे अध्यक्ष आर. पी. गोरे यांना प्रदान करण्यात आला. चॅप्टरचे अध्यक्ष आर. पी. गोरे यांनी स्वागत केले. एस. आर. पिंपळे यांनी परिचय करून दिला, तर ए. आर. जोशी यांनी चर्चासत्र आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. चॅप्टरचे उपाध्यक्ष आर. बी. शुक्ला यांनी सूत्रसंचालन केले तसेच आभार मानले. कार्यक्रमाला एम. आर. पंडित, एस. के. जैन, जी. आर. कुलकर्णी आदी उपस्थित होते.



'अर्थसंकल्प २००६' या चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त आर. के. राऊतरे यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर आर. बी. शुक्ला, एस. आर. भार्गवे, आर. पी. गोरे आणि एस. के. जैन.

D. SAKAL 18-3-2006

Kmat Times

h March - 2006

# 77 city candidates pass out in ICWAI examinations

**LOKMAT NEWS SERVICE**

**Aurangabad, March 6:** As many as 77 candidates from the city have passed the institute of cost and works accountants of India (ICWAI) examination held in December 2005.

The Aurangabad chapter of ICWAI has trained these students.

Out of total number of students 32 succeeded in the foundation exam, 35 in inter and 10 students made it in the final exam of ICWAI. The current year's ratio of students who have passed the ICWAI exams from the city has gone up as compared to last year.

The president of the chapter, R P Gore, president of the training committee, A R Joshi and all the staffers of the chapter have congratulated the successful candidates.

Lokmat Tami